# रेल्वे भरती बोर्ड - मुंबई

मंडळ रेल्वे कार्यालयाचे कंपाऊन्ड, पश्चिम रेल्वे,
मुंबई सेंट्रल, मुंबई - 400 008.

**वेबसाईट:** www.rrbmumbai.gov.in **ई-मेल:** asrrb-mum@nic.in
**दूरध्वनी क्र.:** 022-23090422 **फॅक्स क्र.:** 022-23090224

## केंद्रीकृत रोजगार सूचना क्र. 01/2014 चे लेखी परीक्षेचे वेळापत्रक

कें.रो.सू. क्र. 01/2014 च्या निम्नलिखित पदासाठी लेखी परीक्षा खाली दिलेल्या कार्यक्रमानुसार आयोजित करण्यात आली आहे.

| कोटि क्र. | पदाचे नाव | उमेदवारांच्या नावाचे पहिले अक्षर | परीक्षेची तारीख | डुप्लिकेट कॉल लेटर जारी करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 ते 127 | सहाय्यक लोको पायलट आणि टेक्निशियन | ए ते के | 15/06/2014 | 13 आणि 14 जून, 2014 |
| | | एल ते आर | 29/06/2014 | 27 आणि 28 जून, 2014 |
| | | एस ते झेड आणि मा.सैनिक., शावि | 13/07/2014 | 11 आणि 12 जुलै, 2014 |

वरील पदासाठी तात्पुरत्या स्वरुपातील पात्र उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी अर्जात दिलेल्या पत्त्यावर परीक्षा केंद्र, वेळ आणि स्थळ यासह प्रवेश पत्र पाठविण्यात आले आहेत / येणार आहेत. अपात्र उमेदवारांना सुद्धा अस्वीकृती पत्र पाठविण्यात आले आहेत.

पोस्टाने उशिरा वा चुकीची पोच झाल्यास रेल्वे भरती बोर्ड जबाबदार राहणार नाही. ज्या तात्पुरत्या स्वरुपातील पात्र उमेदवारांना प्रवेश पत्र मिळाले नसतील किंवा चुकीचे नाव, समुह, कोटि क्र., फोटो आणि नि:शुल्क रेल्वे पास (अजा/अजजा साठी) मिळाले असतील तर ते स्वत: अचुक/डुप्लिकेट प्रवेश पत्र मिळविण्यासाठी रेल्वे भरती बोर्डाच्या मुंबई कार्यालयात वरील दिलेल्या कार्यक्रमानुसार **सकाळी 10.00** पासून **संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत** संपर्क करू शकतात. उमेदवारांनी अर्ज जमा करण्यासाठी योग्य ती कागदपत्रे जसे डीडी/आयपीओ च्या प्रती, फोटो, वयाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, इ. पुरावा म्हणून आपल्यासोबत आणावे.

इतर तपशिलासह अर्जाची स्थिती रेल्वे भरती बोर्डाची वेबसाईट **http://www.rrbmumbai.gov.in** वर पाहू शकतात. कृपया नोंद घ्यावी की डुप्लिकेट प्रवेश पत्र केवळ त्याच उमेदवारांना जारी केले जातील, ज्यांची नावे पात्र उमेदवारांच्या मास्टर सूचीमध्ये दिलेली आहेत.

**सूचना :** वरील दिलेल्या तारखेनुसार **संध्याकाळी 5.00 वा.** नंतर डुप्लिकेट कॉल लेटर जारी करण्यासंबंधी किंवा त्या संबंधित उमेदवारांची कोणतीही चौकशी लक्षात घेतली जाणार नाही.

**RRB/BCT/2014-15/08** **अध्यक्ष**

**ग्राहकांच्या सेवेत, हसत मुखाने**